वाचा :- 1. साथरोग प्रतिबंधक कायदा, 1897
2. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005
3. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144
4. मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.आव्यप्र-2020/प्र.क्र.92/आव्यप्र-1 दि. 4 जून 2021
5. इकडील आदेश क्र.डिसी/एमएजी/2/एसआर/52/2021 दि.06/06/2021, क्र.डिसी/एमएजी/2/एसआर/53/2021 दि.06/06/2021, क्र.डिसी/एमएजी/2/एसआर/54/2021 दि.08/06/2021, क्र.डिसी/एमएजी/2/एसआर/55/2021 दि.10/06/2021 व क्र.डिसी/एमएजी/2/एसआर/56/2021 दि.11/06/2021
6. मा. प्रधान सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.आव्यप्र-2020/प्र.क्र.92/आव्यप्र-1 दि. 17 जून 2021

---

क्र.डिसी/एमएजी/2/एसआर/57/2021

जिल्हादंडाधिकारी सातारा यांचे कार्यालय,
दिनांक :- 18/06/2021

आदेश

ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.आव्यप्र-2020/प्र.क्र.92/आव्यप्र-1 दि. 4 जून 2021 मधील सुचनेनुसार, इकडील आदेश क्र.डिसी/एमएजी/2/एसआर/56/2021 दि. 11/06/2021 अन्वये आदेश पारीत करणेत आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. प्रधान सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.आव्यप्र-2020/प्र.क्र.92/आव्यप्र-1 दि. 17 जून 2021 अन्वये,कोविड बाधीत रुग्णांचा पॉझीटीव्हीटी रेट व ऑक्सिजन बेडस व्यापलेची टक्केवारीच्या निकषानुसार सातारा जिल्हयाचा तिसऱ्या स्तरामध्ये समाविष्ट होत असलेने मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.आव्यप्र-2020/प्र.क्र.92/आव्यप्र-1 दि. 4 जून 2021 मधील सुचनेनुसार आदेश पारीत करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, शेखर सिंह. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सातारा., फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 व आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 मधील तरतूदीनुसार प्राप्त अधिकारान्वये दिनांक 19/06/2021 रोजीचे 00.00 वा पासून ते पुढील आदेश होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

I. **आर्थिक /सामाजिक क्रिया कलाप यावर खालील प्रमाणे निर्बंध लागू करणेत येत आहेत.**

1. **सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वानुसार सातारा जिल्हयामध्ये आठवडयाचे सर्व दिवशी सकाळी 5.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जमावबंदी व सायंकाळी 5.00 वाजलेपासून ते सकाळी 5.00 वाजेपर्यंत संचार बंदी लागू करणेत येत आहे. त्यामुळे संचारबंदीचे वेळेत वैध कारणाशिवाय कोणत्याही व्यक्तीस संचार करणेस मनाई करणेत येत आहे.**
2. सातारा जिल्हयातील सर्व शाळा, महाविदयालये, कोचिंग क्लासेस पुर्णपणे बंद राहतील. तथापि, ऑनलाईन शिक्षणास परवानगी असेल. तसेच वैदयकीय महाविदयालये, नर्सिंग कोर्सेस चालू ठेवणेस परवानगी असेल.

3. अत्यावश्यक बाबीची दुकाने/आस्थापना या आठवडयाचे सर्व दिवशी **सकाळी 9.00 ते सायं 04.00 वा** पर्यंत चालु ठेवणेस परवानगी असेल. मात्र मेडिकल/औषधांची दुकाने सकाळी 9.00 ते रात्रौ 8.00 वाजेपर्यंत चालू राहतील. तथापि, हॉस्पीटल मधील मेडिकल/औषधांची दुकाने पुर्णवेळ चालू ठेवणेस परवानगी असेल.
4. अत्यावश्यक नसलेली दुकान/आस्थापना ही सोमवार ते शुक्रवार सकाळी 09.00 ते सायं. 04.00 वा पर्यंत चालू ठेवणेस परवानगी असेल.
5. मॉल / सिनेमागृहे (एक किंवा अनेक पडदी)/ नाटयगृहे इ पुर्णपणे बंद राहतील.
6. सोमवार ते शुक्रवार सकाळी 07.00 ते सायं 04.00 या कालावधीत हॉटेल, रेस्टॉरंटस् यांना आसन क्षमतेच्या 50% क्षमतेने चालू ठेवणेस परवानगी असेल. तसेच आठवडयाचे सर्व दिवशी सकाळी 07.00 ते रात्रौ 08.00 या कालावधीत घरपोच पार्सल सेवा चालू ठेवणेस परवानगी असेल.
7. लॉजिंग / बोर्डींग चालू ठेवणेस परवानगी असेल. तसेच लॉजिंग मध्ये वास्तव्यास असलेल्या व्यक्तींना सकाळी 07.00 ते सायं 04.00 या कालावधीतच रेस्टॉरंट मध्ये सेवा देता येईल व त्यानंतर त्यांचे वास्तव्य असलेल्या रुम मध्ये सेवा पुरविणे बंधनकारक असेल.
8. सार्वजनिक जागा/खुली मैदाने/ चालणे/सायकल चालविणे साठी आठवडयाचे सर्व दिवशी सकाळी 05.00 ते सकाळी 09.00 या वेळेत परवानगी असेल.
9. सर्व खाजगी कार्यालयांना सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत 50 टक्के क्षमतेने चालू ठेवणेस परवानगी असेल.
10. शासकीय/निम-शासकीय कार्यालये 50 टक्के क्षमतेने चालू ठेवण्यास परवानगी देणेत येत आहे.
11. खुल्या जागेतील क्रिडा विषयक बाबी या आठवडयाचे सर्व दिवशी सकाळी 05.00 ते सकाळी 09.00 या वेळेत चालू ठेवणेस परवानगी असेल. मात्र कोणत्याही क्रिडासंबंधी स्पर्धा आयोजित करणेस मनाई असेल.
12. चित्रीकरण - आयसोलेशन बबलमध्येच चित्रीकरण व वास्तव्य करणे बंधनकारक राहील. कोणतेही गर्दीचे व गर्दी होईल, असे चित्रीकरण करता येणार नाही. तसेच आयसोलेशन बबलच्या बाहेर सायंकाळी 05.00 नंतर कोणालाही संचार / प्रवास करता येणार नाही.
13. सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक/प्रार्थना स्थळे, करमणुक कार्यक्रम, मेळावे हे जागेच्या इत्यादी पुर्णपणे बंद राहतील. तथापि सर्व धार्मिक आणि प्रार्थना स्थळामध्ये धार्मिक सेवा करणारे सेवेकरी यांना त्यांच्या पारंपारीक / धार्मिक सेवा करता येतील. यावेळी कोणत्याही बाहेरील भक्तांस प्रवेश असणार नाही. मात्र शासकीय कार्यक्रमांसाठी जागेच्या 50% क्षमतेने आयोजीत करणेस परवानगी असेल.
14. सातारा जिल्हयातील प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कोणतेही कार्यक्रम आयोजीत करणेस मनाई आहे. तथापि, प्रतिबंधित क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय/हॉल/सभागृह, घर व घराच्या परिसरात, एक हॉल/कार्यालयामध्ये एकच लग्न समारंभ दोन तासापेक्षा जास्त नसेल इतक्या कालावधीत 25 लोकांच्या (संपुर्ण कार्यक्रमासाठी भटजी, वाजंत्री, स्वयंपाकी/वाढपी इ. सह) मर्यादेत लग्न आयोजन करणेकामी संबंधित तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सातारा यांचेकडील आदेश क्र.नैआ/कावि/437/2021 दि. 02/03/2021 मधील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. याबाबत उल्लंघन झालेस संबंधित व्यवस्थापन यांचेकडून प्रथम वेळी रक्कम रुपये 25000/- दंड तसेच दुसऱ्या वेळी भंग झालेस रक्कम रुपये 1,00,000/- व फौजदारी कारवाई करावी. तसेच कोविड -19 च्या अनुषंगाने निर्गमीत अटी व शर्तीचे पालन न करणाऱ्या किंवा या निर्बंधाचा भंग करणाऱ्या कुटूंबास रक्कम रु 25,000/- इतका दंड आकारला जाईल. शासनाचे दिनांक 15 मार्च 2021 व 17 मार्च 2021 चे आदेशातील तरतुदीनुसार, जोपर्यंत केंद्र

शासनाचे आपत्ती व्यवस्थापनाकडून कोविड- 19 साथीचा रोग आटोक्यात आलेचे जाहिर होत नाही., तोपर्यंत संबंधित मालमत्ता बंद राहील.

15. जास्तीत जास्त 20 नातेवाईक/ नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यविधी व दशक्रिया विधी करणेस परवानगी असेल.
16. बैठका/निवडणुक - स्थानिक संस्थांच्या / सहकारी संस्थाच्या सर्वसाधारण सभा या ज्या ठिकाणी सभा होणार अशा ठिकाणच्या मर्यादेच्या 50 टक्के क्षमतेने घेणेस परवानगी असेल.
17. सर्व बांधकामांना परवानगी असेल. ज्या मजुरांची राहण्याची व्यवस्था बांधकामाच्या ठिकाणी असेल त्यांनी बांधकाम करणेस हरकत नाही तथापि, ज्या मजूरांची राहण्याची व्यवस्था बांधकामाच्या ठिकाणी नसेल अशा मजूरांनी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत बांधकाम ठिकाण सोडावे.
18. शेतकरी यांना आवश्यक असणारी बियाणे, खते, शेती विषयक उपकरणे व त्यांची दुरुस्ती व देखभाल पुरविणाऱ्या सेवांची दुकाने आठवडयाचे सर्व दिवशी सायं. 04.00 वा पर्यंत चालु ठेवणेस परवानगी असेल. तसेच शेती विषयक (मशागत) करणेची सेवा करणेस आठवडयाचे सर्व दिवशी सायंकाळी 04.00 वा पर्यंत परवानगी असेल.
19. ई-कॉमर्सच्या वस्तू तसेच सेवा नियमितपणे चालू ठेवणेस परवानगी असेल.
20. व्यायामशाळा/ केश कर्तनालय/सौंदर्य केंद्रे/ स्पा/ वेलनेस सेंटर ही आसन क्षमतेच्या 50% क्षमतेने फक्त अगोदर भेटीची वेळ (prior Appointment) ठरवून तसेच विना-वातानूकुलीत (Non AC) जागेसाठी सायंकाळी 04.00 वा पर्यंत चालु ठेवणेस परवानगी राहील.
21. सार्वजनिक परिवहन बसेस सेवा या 100 टक्के क्षमतेने चालु ठेवणेस परवानगी राहील. कोणत्याही प्रवाशास उभे राहून प्रवास करणेची परवानगी नसेल.
22. मालवाहतूक वाहनामधून वाहन चालक/ मदतनीस/ क्लिनर किंवा इतर असे एकुण जास्तीत जास्त 3 व्यक्तीस प्रवासास परवानगी असेल.
23. खाजगी वाहने/ टॅक्सी/ बसेस/ लांब पल्ल्याच्या रेल्वे द्वारे प्रवाशांचा आंतर जिल्हा प्रवास नियमीत सुरु राहील - परंतू सदर वाहनामधून स्तर पाच मध्ये समाविष्ठ असलेल्या जिल्हयामधून येणाऱ्या प्रवाशास ई पास बंधनकारक असेल.
24. उत्पादन क्षेत्र - निर्यातभिमुख यंत्रणा की ज्यामध्ये सुक्ष्म, लघु आणि मध्यम उदयोग ज्यांना निर्यात बंधन पूर्ण करण्याची आवश्यकता आहे अशा यंत्रणा नियमितपणे चालू ठेवणेस परवानगी असेल.
25. उत्पादन- 1. जीवनावश्यक वस्तू उत्पादन घटक (कोणत्याही वस्तूसाठी कच्चा माल / पॅकेजिंग तयार करणार आवश्यक वस्तू आणि घटक, वस्तू आणि संपूर्ण पुरवठा साखळी), 2. सतत प्रक्रिया उदयोग की जे तातडीने थांबवता येत नाहीत आणि आवश्यक वेळ दिल्याशिवाय पुन्हा सुरु होवू शकत नाहीत., 3. राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण यांचे अनुषंगाने महत्वाच्या घटकाची निर्मिती करणारे उदयोग, 4. डाटा सेंटर / क्लाऊड सर्व्हिस प्रोव्हायडर / आयटी क्षेत्रातील गंभीर पायाभूत सुविधांना सहाय्य करणारे प्रदाता - अशा यंत्रणा नियमितपणे चालू ठेवणेस परवानगी असेल.
26. उत्पादन - उत्पादन क्षेत्रातील इतर उत्पादन घटक जे आवश्यक, निरंतर प्रक्रिया किंवा निर्यात देणाऱ्या घटकाअंतर्गत येत नाहीत अशा यंत्रणा 50% कर्मचाऱ्यांचे मर्यादेत चालू ठेवणेस परवानगी असेल. सदर कर्मचारी यांची हालचाल TRANSPORT BUBBLE मध्ये असणे बंधनकारक राहील.
27. शिवभोजन थाळी योजना चालू ठेवणेस परवानगी असेल

**II. सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना -**

1. ज्या आस्थापनांना सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत चालू ठेवणेस परवानगी देणेत आली आहे., त्या आस्थापनावरील कर्मचारी यांना त्यांचे घरी पोहोच होणेसाठी सायं 05.00 वाजेपर्यंत प्रवास करणेस परवानगी असेल.

2. स्तर पाच मध्ये समाविष्ठ असलेल्या जिल्हयामधून येणाऱ्या प्रवाशांना वैयक्तीक स्वतंत्र पास असणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या वाहनांना स्वतंत्र पासची आवश्यकता असणार नाही.

3. कोविड-19 व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी शासकीय कार्यालये आणि अत्यावश्यक सेवा 100% कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसह चालू राहतील. इतर सरकारी कार्यालयांबाबत सबंधित विभाग प्रमुख हे कर्मचाऱ्यांच्या आवश्यक जास्तीच्या उपस्थिती बाबतचा निर्णय स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या परवानगीने घेवू शकतील.

**4. अत्यावश्यक सेवांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल -**

1) रुग्णालये,निदान केंद्रे (Diagnostic Centers), दवाखाने, लसीकरण केंद्रे, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध दुकाने (Pharmacies) औषध कंपन्या, इतर वैद्यकीय आणि आरोग्य सेवा व सदर सेवा पुरविणारी उत्पादक केंद्रे, वाहतूक व पुरवठा साखळीस परवानगी असेल. लस,सॅनिटायझर, मास्क व वैद्यकीय उपकरणे व अशा सेवांना लागणारा कच्चा माल व त्याच्याशी सबंधित उत्पादन व वितरण.

2) व्हेटरीनरी हॉस्पिटल्स, ॲनिमल केअर शेल्टर्स व पेट फुड शॉप्स.

3) वनविभागाने घोषित केल्यानुसार वनाशी संबंधित सर्व कामकाज

4) किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी कन्फेक्शनरी, मटन, चिकन, अंडी, मासे दुकाने, इत्यादींची सर्व प्रकारच्या खाद्यपदार्थांची दुकाने.

5) कोल्ड स्टोरेज आणि गोदाम सेवा

6) सार्वजनिक वाहतूक - विमान, रेल्वे, टॅक्सी, ऑटो आणि सार्वजनिक बस.

7) राज्य व स्थानिक प्राधिकरणांचे मान्सूनपूर्व उपक्रम / सातारा जिल्हयाचे पश्चिम भागातील खाजगी व्यक्तींची मान्सूनपूर्व कामे

8) स्थानिक प्राधिकरणाद्वारे सर्व सार्वजनिक सेवा.

9) भारतीय रिझर्व्ह बँक आणि आरबीआयने नियुक्त केलेल्या आवश्यक सेवा

10) सेबीच्या सर्व कार्यालये बाजारातील मूलभूत सुविधा संस्थांसारख्या स्टॉक एक्सचेंजेस, डिपॉझिटरीज, क्लियरिंग कॉर्पोरेशन आणि इतर मध्यस्थी सेबीकडे नोंदणीकृत आहेत.

11) दूरसंचार सेवांच्या दुरुस्ती / देखभालीसाठी आवश्यक सेवा

12) माल वाहतूक, पाणीपुरवठा सेवा

13) शेती संबंधी उपक्रम, बियाणे, खते, उपकरणे व त्याची दुरुस्ती यासह कृषी क्षेत्राचे अखंड निरंतरता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असणारी कृषी संबंधित क्रियाकलाप आणि त्याशी संबंधित संलग्न उपक्रम.

14) सर्व वस्तूंची निर्यात-आयात

15) ई-कॉमर्स (केवळ आवश्यक वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यासाठी),

16) अधिकृत मीडिया

17) पेट्रोल पंप आणि पेट्रोलियम संबंधित उत्पादने;

18) गंभीर पायाभूत सुविधा आणि सेवांना आधार देणारी डेटा सेंटर क्लाउड सर्व्हिसेस/आयटी सेवा

19) सरकारी आणि खाजगी सुरक्षा सेवा

20) विदयुत आणि गॅस पुरवठा सेवा

21) ATM,s ,पोस्टल सेवा,

22)कस्टम हाऊस एजंट्स / परवानाकृत मल्टि मोडल ट्रान्सपोर्ट ऑपरेटर जे लस / जीवनरक्षक औषधे / फार्मास्युटिकल उत्पादनांच्या हालचालीशी संबंधित आहेत.

23) कोणत्याही अत्यावश्यक सेवेसाठी कच्चा माल, पॅकेजिंग सामग्रीची निर्मिती करणारे घटक

24) व्यक्तींसाठी तसेच संस्थांसाठी पावसाळ्याच्या हंगामासाठी साहित्याच्या उत्पादनामध्ये

गुंतलेली यंत्रणा

25) मालवाहतूक व अत्यावश्यक सेवेतील वाहनांच्या दुरुस्तीसाठी गॅरेज, स्पेअर पार्ट, पंक्चर दुकाने

26) सातारा जिल्ह्यातील सर्व बाजार समित्या सकाळी 07.00 वा. ते दुपारी 02.00 वा. पर्यंत सुरु राहतील. बाजार समित्यांच्या ठिकाणी फक्त घाऊक किंवा किरकोळ विक्रेत्यांनाच तेथे जावून माल घेता येईल, कोणत्याही वैयक्तीक व्यक्तीस बाजार समितीच्या ठिकाणी प्रवेश नसेल या शर्तीसह सुरु राहतील. याबाबत नियंत्रण करण्याची जबाबदारी त्या त्या स्थानिक नागरी / ग्रामीण प्रशासन संस्थेची असेल.

27) स्थानिक आपत्ती व्यवस्थापनाद्वारे आवश्यक सेवा म्हणून नियुक्त केलेल्या कोणत्याही सेवा

5. सूट देणेत आलेल्या बाबी / आस्थापना(Exemption Category)

a) केंद्रीय, राज्य आणि स्थानिक प्रशासनाची सर्व कार्यालये आणि त्यामध्ये समाविष्ठ असलेली सर्व वैधानीक प्राधिकरणे व संस्था

b) सहकारी, पीएसयू आणि खाजगी बँका

c) अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या कंपनींची कार्यालये

d) विमा/ वैद्यकीय हक्क सबंधित सेवा

e) उत्पादन/वितरण व्यवस्थापित करण्यासाठी आवश्यक असणारी फार्मास्युटिकल कंपनीची कार्यालये

f) रिझर्व्ह बँकेने स्टँड अलोन प्राइमरी डीलर्स, सीसीआयएल, एनपीसीआय, पेमेंट सिस्टम ऑपरेटर आणि आरबीआयच्या नियमन केलेल्या बाजारपेठेत कार्यरत वित्तीय बाजारातील सहभागींसह घटक आणि मध्यस्थ

g) सर्व नॉन-बँकिंग फायनान्शियल कॉर्पोरेशन

h) सर्व सूक्ष्म वित्त संस्था

i) न्यायालये, न्यायाधिकरण किंवा चौकशी आयोगांचे कार्य चालू असल्यास वकिलांची कार्यालये.

6. वर्तमानपत्रे / मासिके/ नियतकालिके

- वर्तमानपत्रे / मासिके/ नियतकालिके छपाईस व वितरणास परवानगी असेल.

7. ". 'आयसोलेशन बबल' म्हणजे कामकाजासाठी ऑनसाईट निवासस्थान किंवा जवळपासची सोय. समर्पित वसाहतींद्वारे ज्यात हालचाली समर्पित परिवहन सेवेद्वारे केली जातात, ज्यात जास्तीत जास्त 10% व्यवस्थापकीय कर्मचारी बाहेरून येतात. "ट्रान्सपोर्ट बबल" म्हणजे सार्वजनिक वाहनातून नव्हे तर समर्पित परिवहन सेवेतील बाहेरील कर्मचाऱ्यांची हालचाल.

8. दंड-

1. सार्वजनिक ठिकाणी / सार्वजनिक वाहतूक या ठिकाणी विना मास्क असणाऱ्या व्यक्तींकडून 500/- रु दंड आकारणेत यावा.
2. रेस्टॉरंट, हॉटेल बाबतीत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर प्रत्येकी 1000/- रु दंड आकारणेत यावा. तसेच सदर आस्थापनेकडून र. रु. 10,000/- इतका दंड आकाराला जाईल. सदर कारवाई नंतरही वारंवार सदर नियमांचे उल्लंघन झालेस केंद्र शासनाकडून जोपर्यंत कोरोना विषयक कायदा अस्तित्वात असेल तोपर्यंत सदरची आस्थापना बंद केली जाईल.
3. अत्यावश्यक सेवेतील दुकानातील मालक, कर्मचारी किंवा ग्राहक यांनी वरील नियमांचे पालन न केलेस त्यांचेवर र.रु 500 /- इतका दंड आकाराला जाईल आणि जर एखादा ग्राहक कोव्हीड- 19 विषयक नियमांचे पालन करीत नसताना सबंधित दुकानातून जर सदर ग्राहकास सेवा दिली जात असेल तर सदर दुकानावर र.रु.1,000/- इतका दंड आकारला जाईल. वारंवार सदर नियमाचे

उल्लंघन झालेस केंद्र शासनाकडून जितक्या कालावधीसाठी कोव्हीड- 19 साथरोग हा आपत्ती म्हणून अधिसूचित असेल तितक्या कालावधीसाठी संबंधित आस्थापना/दुकान बंद केले जाईल.

4. विनाकारण व विनामास्क फिरणाऱ्या व्यक्तिंच्या बाबतीत अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा यांचेकडील आदेश क्रमांक नैआ/कावि/1358/2021 दिनांक 12/05/2021 नुसार रक्कम रुपये 500/- दंड आकारणेत यावा.

CONTAINMENT ZONE बाबत संबंधित INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय अधिकारी हे ज्या ज्या वेळी स्वतंत्र आदेश काढून CONTAINMENT ZONE जाहीर करतील व सदर क्षेत्रामध्ये जे निर्बंध लागू करतील ते आदेश CONTAINMENT ZONE क्षेत्रास लागू राहतील.

सदर आदेशाची अंमलबजावणी पोलीस अधीक्षक, Incident Commander तथा उपविभागीय दंडाधिकारी, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी नगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था व सर्व संबंधित प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी करावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधीतांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीतांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 51 ते 60, व भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 नुसार तसेच भारतीय साथरोग अधिनियम 1897 अन्वये दंडनीय / कायदेशीर कारवाई संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी करावी.

**सदरचा आदेश आज दिनांक 18/06/2021 रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला.**

(शेखर सिंह)
जिल्हादंडाधिकारी सातारा

प्रति,

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा
2. पोलीस अधिक्षक, सातारा
3. जिल्हा शल्य चिकित्सक , सातारा
4. सर्व विभाग प्रमुख - संबंधीत कार्यालय / आस्थापना-------------जिल्हा सातारा
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व ------------------ (सातारा जिल्हा)
6. महा व्यवस्थापक, जिल्हा औदयोगिक केंद्र, एम.आय.डी.सी. सातारा
7. जिल्हा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य अधिकारी, एम.आय.डी.सी. सातारा
8. क्षेत्रिय व्यवस्थापक, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ सातारा / कराड
9. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी/गट विकास अधिकारी सर्व --------- (सातारा जिल्हा)
10. मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपालिका/नगरपंचायत ----------------(सातारा जिल्हा)
11. जिल्हा माहिती अधिकारी, सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी
12. मॅनेजर, प्रिंटींग प्रेस, येरवडा, पुणे 6 यांचेकडे राजपत्रात प्रसिध्दीसाठी

प्रत - मा. प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश, सातारा, जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा यांना माहितीस्तव